I J R S S I S, Issue (IX), Vol. (I), May 2023: 97-101
A Double-Blind Peer Reviewed Journal
OPEN ACCESS
e-ISSN 2347 – 517X
Original Article

Reg. No. : MH-NGP/0000167
INTERNATIONAL JOURNAL OF RESEARCHES IN SOCIAL SCIENCE AND INFORMATION STUDIES
© VMS RESEARCH FOUNDATION www.ijrssis.in

# मानवाधिकार संरक्षणार्थ संविधानिक कायदे आणि मानवाधिकार शिक्षण

**अशोक तुकाराम खोब्रागडे**
राज्यशास्त्र विभाग, राष्ट्रपिता महात्मा गांधी कला आणि वाणिज्य महाविद्यालय, सावली
*Corresponding Author :-ashokkhobragade60@gmail.com

Communicated : 16.01.2023 | Revision : 23.02.2023 | Accepted : 21.03.2023 | Published : 30.05.2023

**सारांश** : मानवाधिकाराचा संबंध मानवाच्या व्यक्तित्व व सर्वांगिण विकासाशी जुडलेला आहे. अर्थात विविध राष्ट्रांना असा अधिकार प्रदान करण्याची आहे कि, ज्याचा उपयोग करून प्रत्येक राष्ट्र आपल्या विकासाला गतिशील बनवेल. कोणत्याही देश अथवा प्रदेशाच्या राजकीय परिस्थिती बाबत भेदभाव न करता विशेषत: शाळा आणि इतर शैक्षणिक संस्थांमधून मानवाधिकराचा प्रचार, प्रसार, वाचन आणि चर्चा घडवून आणणे आवश्यक आहे.

मानवाधिकारासंबंधी जागतीक स्तरावर विविध सम्मेलने व चर्चा होत असली तरी मानवाधिकार अजूनपर्यंत समाजातील तळागाळातील लोकांपर्यंत पोहोचलेला नाही. आजही समाजामध्ये धर्म, वंश, जात, लिंग अणि जन्मस्थान इ. च्या आधारावर भेदभाव केल्या जातो. महिलांवरील अत्याचारात तर मागील काही दशकांपासून सतत वाढ होत आहे. महिलांवरील अत्याचार, बलात्कार, लैंगिक छळ प्रामुख्याने सार्वजनिक तसेच काम करण्याच्या ठिकाणी वाढत जात आहे. महिलांना सशक्त बनविणे आज सर्वात महत्वपूर्ण मुद्दा आहे. त्यांना सशक्त बनविण्याची सर्वात कार्यक्षम पध्दत त्यांना कायदेशीर अधिकारांची माहिती देणे आहे. त्यामुळे ते कायदयाने त्यांना किती संरक्षण दिले आहे? तसेच काद्याद्वारे ते कोणकोणते अधिकार प्राप्त करू शकतात. अन्याय, अत्याचार तसेच शोषणाचा विरोध कशा करू शकतील? याची जाणीव होईल. ही सर्व माहीती मिळविण्यासाठी महिलांना मानवाधिकार शिक्षेची अत्यंत आवष्यकता आहे. महिलांसोबतच समाजामध्ये बालकांच्या अधिकारावर सुध्दा मोठ्य प्रमाणात अतिक्रमण केले जात आहे. बालकांना शिक्षणापासुन वंचित ठेवणे, कारखाने, खानावळ किंवा इतर धोकादायक कामावर त्यांना ठेवणे, त्यांना शारीरिक व मानसिक त्रास देणे इ. कृत्य समाजामध्ये बालकांविरूध्द होत आहे. विकलांग मुलांना तर अतोनात शारीरिक पिडा सहन करावी लागते. कधी—कधी तर त्यांना बेघर सुध्दा केले जाते. अषा प्रकारचे छळ थांबविण्यासाठी व महिला तसेच बालकांच्या हित संरक्षणासाठी मानवाधिकार शिक्षेची नितांत गरज आहे.

**बिजशब्द**:- मानवाधिकार खानावळ विकलांग **संविधानिक**

**प्रस्तावना :-**

मानवाधिकाराचा संबंध मानवाच्या व्यक्तित्व व सर्वांगिण विकासाशी जुडलेला आहे. अर्थात विविध राष्ट्रांना असा अधिकार प्रदान करण्याची आहे कि, ज्याचा उपयोग करून प्रत्येक राष्ट्र आपल्या विकासाला गतिशील बनवेल. यासाठी संयुक्त राष्ट्राच्या सर्वसाधाराण सभेने 10 डिसेंबर 1948 रोजी एक सार्वभौमिक घोषणा पत्र जाहीर केला. या ऐतिहासिक घोषणापत्रामध्ये मनुष्याच्या विकासासाठी आवष्यक गोष्टींचा उहापोह केला गेला व संयुक्त राष्ट्राच्या सदस्य राष्ट्रांना अशी विनंती करण्यात आली की, त्यांनी कोणत्याही देश अथवा प्रदेशाच्या राजकीय परिस्थिती बाबत भेदभाव न करिता विशेषतः शाळा आणि इतर शैक्षणिक संस्थांमधून मानवाधिकराचा प्रचार, प्रसार, वाचन आणि चर्चा घडवून आणणे आवष्यक आहे.

मानवाधिकारासंबंधी जागतीक स्तरावर विविध सम्मेलने व चर्चा होत असली तरी मानवाधिकार अजूनपर्यंत समाजातील तळागाळातील लोकांपर्यंत पोहोचलेला नाही. आजही समाजामध्ये धर्म, वंश, जात, लिंग अणि जन्मस्थान इ. च्या आधारावर भेद केल्या जातो. महिलांवरील अत्याचारात तर मागील काही दशकांपासून सतत वाढ होत आहे. महिलांवरील अत्याचार, बलात्कार, लैंगिक छळ प्रामुख्याने सार्वजनिक तसेच काम करण्याच्या ठिकाणी वाढत जात आहे. महिलांना सशक्त बनविणे आज सर्वात महत्वपूर्ण मुद्दा आहे. त्यांना सशक्त बनविण्याची सर्वात कार्यक्षम पध्दत त्यांना कायदेशीर अधिकारांची माहिती देणे आहे. त्यामुळे ते कायदयाने त्यांना किती संरक्षण दिले आहे? तसेच काद्याद्वारे ते कोणकोणते अधिकार प्राप्त करू शकतात. अन्याय, अत्याचार तसेच शोषणाचा विरोध कशा करू शकतील?

याची जाणीव होईल. ही सर्व माहीती मिळविण्यासाठी महिलांना मानवाधिकार शिक्षेची अत्यंत आवष्यकता आहे. महिलांसोबतच समाजामध्ये बालकांच्या अधिकारावर सुध्दा मोठ्या प्रमाणात अतिक्रमण केले जात आहे. बालकांना शिक्षणापासुन वंचित ठेवणे, कारखाने, खानावळ किंवा इतर धोकादायक कामावर त्यांना ठेवणे, त्यांना शारीरिक व मानसिक त्रास देणे इ. कृत्य समाजामध्ये बालकांविरूध्द होत आहे. विकलांग मुलांना तर अतोनात शारीरिक पिडा सहन करावी लागते. कधी-कधी तर त्यांना बेघर सुध्दा केले जाते. अषा प्रकारचे छळ थांबविण्यासाठी व महिला तसेच बालकांच्या हित संरक्षणासाठी मानवाधिकार शिक्षेची नितांत गरज आहे.

**संशोधन पद्धती-**

संबंधित शोधलेखामध्ये वर्णनात्मक संशोधन पद्धतीचा वापर करण्यात आला आहे.

**उद्दिष्ट्ये-**

शोधलेखनामागील मुख्य उद्दिष्ट्ये हे समाजातील तळागाळातील घटकांना त्यांचे मानवाधिकार आणि संविधानिक कायद्यांची माहिती करून देणे हा आहे.

**गृहीतक-**

आजही वर्तमान व सुशिक्षित असलेल्या समाजामध्ये मानवाधिकाराचे उल्लंघन करून महिला व बालकांना पिडीत केल्या जाते.

**संसोधनाचे महत्व-**

आज महिला व बालकांवरील अत्याचाराचे व्यावहारिक स्वरूप बघता मानवाधिकार शिक्षणाची दिवसेंदिवस गरज भासत आहे.

१. मानवाधिकारामुळे महिला व बालकांमध्ये त्यांच्या अधिकाराप्रती जागरुकता येते.

२. मानवाधिकार शिक्षणामुळे महिला व बालकांच्या हित संरक्षणार्थ असलेल्या विविध कायद्यांची माहिती मिळते.

३. मानवाधिकार शिक्षणामुळे आपल्यावर होणारया अन्यायाविरुध्द लढण्यास प्रोत्साहन मिळतो.

अशाप्रकारे संबंधित शोध लेखनामध्ये संसोधकाने समाजातील ज्वलंत समस्याचा उहापोह करून संसोधानाच्या माध्यमातून मानवाधिकार व त्या संरक्षणार्थ असलेल्या कायद्याप्रती जागरूकता निर्माण करण्याचा प्रयत्न केला आहे.

**मानवाधिकाराचा अर्थ:**

मानवाधिकार म्हणजे असे अधिकार की जे मनुष्याच्या अस्तित्वासोबतच प्रत्येक मनुष्याला विना कोणत्या भेदभावाणे जन्मजात प्राप्त आहेत. याशिवाय कोणताही व्यक्ती आपला बौध्दीक, मानसिक, शारीरिक, सामाजिक, नैतिक व आर्थिक विकास करू शकत नाही. हा मनुष्याच्या सम्मानासाठी आणि स्वातंत्र्यासाठी आवश्यक आहे. मनुष्य जातीसाठी मानवाधिकारांचे अनन्यसाधारण महत्व आहे.

लास्की ने लिहिले आहे की, "अधिकार मानव जीवनाची अशी परिस्थिती आहे की ज्याच्या शिवाय कोणताच व्यक्ती पूर्णपणे विकास करू शकत नाही."

**मानवाधिकार शिक्षणाची गरज:**

मानवाधिकाराचे महत्व हे आजच्या परिस्थितीतमध्ये समजून घेणे ही काळाची गरज बनली आहे. जोपर्यंत व्यक्तीला मानवाधिकार काय आहे? हे समजणार नाही, तोपर्यंत समाजामध्ये अन्याय अत्याचार होत राहतील. त्यातही मुख्य दुर्बल घटक म्हणजे महिला व बालकांवर याचा जास्त जोर चढेल. यासाठी समाजातील युवा वर्गाला शिक्षीत करणे आवष्यक आहे. या अवस्थेमध्ये तो मानवी जीवनाच्या संबंधी मनन चिंतन करण्यासाठी समर्थ होईल. महाविद्यालयीन शिक्षा पूर्ण केल्यानंतर विद्यार्थी व्यावहारिक क्षेत्रामध्ये कोणता कर्मचारी, सेवक, व्यवस्थापक किंवा अधिकारयाच्या रूपामध्ये आपली सेवा प्रदान करीत असतो. पण आवश्यक आहे की, शिक्षण पूर्ण केल्यानंतर तो समाजात यावा. यावेळी तो मानवाधिकार आणि त्याचे संरक्षण कसे करावे या

गोष्टीशी पूर्ण परिचीत असेल. मानवाधिकारा संबंधित असे वातावरण निर्माण केल्याजावे की, प्रत्येक विद्यार्थी आपल्या अधिकाराप्रती जागृक होऊ शकेल.

मानवतावाद्यांच्या मते, मानवी तसेच समाज जिवनामध्ये शिक्षणाला अत्यंत महत्वाचे स्थान आहे. शिक्षण आदर्श समाजाच्या स्थापनेचे साधन आहे. मानवाधिकार शिक्षणाद्वारे विश्व बंधुत्वाची भावना विकसित केली जाऊ शकते. तसेच जबाबदारीपूर्ण जीवन व्यतीत करण्याची योग्यता विकसित होते. मानवाधिकार शिक्षणाने मानवी समस्यांना समजून घेवून त्यासमस्या सोडविण्याची क्षमता निर्माण होते. अशा प्रकारे मानवाधिकार शिक्षण मानव केंद्रीत आहे. आज संपुर्ण समाजाला शिक्षणाच्या माध्यमातून जागृत करून त्यांना आपल्या हितसंरक्षणाची माहिती देता येते. महिला व बालकांना सक्तीचे शिक्षण देऊन त्यांना त्यांच्या अधिकाराची जाणीव करून देता येईल. यासाठी समाजातील संपूर्ण वंचित घटकाला शिक्षणाच्या प्रवाहामध्ये आणणे आवश्यक आहे. महिलांना व बालकांना त्यांच्या हित संरक्षणार्थ तयार केलेल्या अध्ययनाची माहिती मानवाधिकार शिक्षणाच्या माध्यमातून देता येते. ग्रामीण, दलित मागास तसेच अभावग्रस्त आई-वडीलांच्या मुलांना आपल्या अधिकाराची जाणीव तेव्हाच होऊ शकते जेव्हा त्यांना समाज आणि शासनाकडून पूर्ण संरक्षण प्राप्त होईल तसेच ते शिक्षित होईल.

**समाजातील महिला मानवाधिकारांचे वर्णन:-**

मानवाधिकारांच्या स्थापनेसाठी केलेल्या संपूर्ण प्रयत्नानंतर भलेही जागतिक दृष्टीने महिलांचे नाव गौरवाने चमकत असले तरी समाजामध्ये अजूनही महिलांच्या मानवाधिकाराची स्थिती चिंताजनक आहे. जगाच्या एका टोकापासून तर दुसरया टोकापर्यंत महिला प्रति दिवस, प्रति तास, प्रति मिनिट आणि प्रत्येक क्षणाला कधी आपल्या तर कधी अनोळखी पुरूषाच्या हाताने मानसिक शोषनापासून तर जाळून मारण्यापर्यंतच्या हिंसेला बळी पडतांना दिसतात. एक सामाजिक प्राणी होण्याच्या नात्याने सर्व व्यक्तिंना सामाजिक सुरक्षेचा हक्क आहे. सामाजिक, राजकीय, आर्थिक सर्वच क्षेत्रामध्ये महिलांच्या अधिकारावर अतिक्रमण केले जाते, या दृष्टिने भारताची स्थिती खूप वाईट आहे. राजकीय क्षेत्रामध्ये प्रतिनिधीत्व देण्याच्या बाबतीत भारत आपल्या शेजारील राष्ट्राच्या खूप मागे आहे. 'पावर वाइस एण्ड राइट्स'(संयुक्त राष्ट्र) नावाच्या रिपोर्ट मध्ये जुलै 2009 च्या आकड्यानूसार भारतीय संसदेतील सभागृहामध्ये महिलांचे प्रतिनिधित्व 10.3 टक्के आहे, तर भूटान मध्ये हा आकडा 13.9 टक्के, पाकीस्तान मध्ये 21.2 टक्के, बांग्लादेशमध्ये 18.6 टक्के आणि नेपाळमध्ये 33.2 टक्के आहे.

स्त्री जगाची जननी आहे, जी जगाचे पालन-पोषण करते. परंतु तिची नेहमी चेष्टाच केली जाते. जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रामध्ये तिच्या सोबत भेदभाव होत आला आहे. महिलांसोबत वाईट व्यवहार आणि छेळछाळीसारखे कृत्य घरात, रस्त्यांवर, बगिच्यांमध्ये, कार्यालय सर्वच ठिकाणी बघायला मिळतात. पोलीस सुध्दा महिलांवर होणारया अत्याचाराला बघुन बेदखल करतात. बलात्कार, हुंडाबळी, खून इ. सारख्या गोष्टी समोर येतात. परंतु त्यापैकी जास्तीत जास्त गुन्हेगारांना माहितीच्या अभावी सोडून दिल्या जाते. बाल विवाह सारख्या समस्यांनी मुली आजही त्रस्त आहेत. महिलांचे अपहरण करूण त्यांना वेश्या बनविणे, जाळून मारणे तसेच त्यांना शारीरिक व मानसिक त्रास देणे सामान्य गोष्ट बनलेली आहे. महिला साक्षरता अभियान तसेच सशक्तिकरणाद्वारेच त्यांना मूलभूत अधिकार प्राप्त होऊ शकतात. 'मध्य प्रदेशातील बेडिया जनजातीमध्ये मुलीचा जन्म आनंद घेऊन येतो कारण मुली वयात आल्या नंतर कुटूंबाच्या रोजी रोटीचे साधन बनतात. देह व्यापाराच्या धंद्यामध्ये परंपरेच्या नावाने आपल्या मुलीला स्वखुशीने ढकलल्या जाते.

**समाजातील बालकांच्या मानवाधिकाराचे वर्णन:**

बालक राष्ट्राचा पाया आहे. बालकांच्या विकासामुळेच राष्ट्राचा विकास शक्य आहे. पण हे तेव्हाच शक्य आहे. जेव्हा मुलांचा योग्य शारीरिक आणि मानसिक विकास होईल, त्यांना चांगले संस्कार मिळायला पाहीजेत. परंतु वास्तविकता ही आहे की, पृथ्वीवर जन्म घेणारया प्रत्येक बालकाला ते सर्व अधिकार प्राप्त होत नाही ज्यावर त्याचा हक्क आहे. विकसनशील तसेच विकसित राष्ट्रांमधील बालकांना मनुष्याला प्राप्त होणारया मुलभुत गरजांच्या पूर्ततेसाठी संघर्ष करावा लागतो. आज बालकांच्या अधिकारांचे संरक्षण आवश्यक आहे. यासाठी जास्तीत-जास्त बालकांना शिक्षण प्रदान करायला पाहिजे. राष्ट्रीय मानव अधिकार आयोगाच्या वार्षिक रिपोर्ट (1995-96) मध्ये असे स्पष्ट केले आहे, जर बालकांचा शोषण तसेच बाल मजूरी सारख्या वाईट प्रथांना थांबवायचं असेल तर 'मोफत तसेच अनिवार्य शिक्षणाला' प्राथमिकच नाहीतर उच्च स्तरावर लागू करायला पाहिजे.

समाजामध्ये सर्वात मोठी समस्या म्हणजे बाल श्रमिकांची आहे. बाल श्रमिकामध्ये वयाची 14 वर्षे पूर्ण न होणारया व्यक्तिचा समावेश होतो. बालश्रम निवारण अधिनियम 1986 मध्ये या वयाला मान्यता दिली गेली आहे. भारतामध्ये बाल श्रमिकांची संख्या 4 कोटी 40 लाख आहे. भारता व्यतिरिक्त आफ्रिकेमध्ये 20 टक्के, दक्षिण अमेरिकेमध्ये 26 टक्के आणि आशियातील इतर देशामध्ये 10 टक्के आहे. भारतामधील एकूण बाल श्रमिकांपैकी 20 टक्के संख्या ग्रामिण भागामध्ये राहते. बाल श्रमिकांचे मुख्य कारण त्यांची आर्थिक स्थिती आहे. दारिद्रच्या कारणाने आई-वडील स्वतःच मुलांना काम करण्यास भाग पाडतात. आज बालक दुकान, होटल, पान टपरी, कारखाने किंवा घरांमध्ये कुठेही काम करतात, अतः त्यांचा शोषण होत असते. बालकांचे यौन शोषण आज चिंतेचा विषय आहे. ही गोष्ट संयुक्त राष्ट्र संघाने बाल अधिकार 1989 मध्ये स्विकार केले आहेत.

स्वतःला मानवाधिकाराचे रक्षक समजणारया अमेरिकेची वास्तविकता अशी आहे की तेथे चैदा वर्षापेक्षाही कमी वय असलेल्या मातांची संख्या लाखोच्या घरात आहे व अवैध आई-वडील नसलेल्या मुलांची संख्या करोडो मध्ये आहे. आई-वडीलांच्या मारहाणीने मरणारया मुलांची संख्या हजारोवर आहे. शाळेमध्ये शिक्षण घेणारया लहान मुलांना सुध्दा आपल्या अस्तित्वासाठी शारीरिक श्रम करावे लागते. अशा प्रकारे बालकांचे अधिकार मानवाधिकार समजून त्यांना न्याय मिळणे ही काळाची गरज आहे. ही व्यावहारिकता इतकी स्फोटक आहे कि त्यांचे दुष्परिणाम या दुर्बल घटकांना शोषावे लागत आहे

**हित संरक्षक संविधानिक कायदे:**

महिला व बालकाचे अधिकार हे मानवाधिकर आहे. ही गोष्ट आज संपूर्ण जगाने मान्य केली आहे. त्यासाठी बरेच कायदे बनविण्यात आले आहे. या संपूर्ण संरक्षक कायद्याची माहिती मानवाधिकार शिक्षणाच्या माध्यमातून समाजापर्यंत पोहचविणे आवश्यक आहे. सदर कायदे पुढील प्रमाणे आहे.

1. विशेष विवाह अधिनियम, 1954 -या कायद्याद्वारे दोन भारतीयांना ते कोणत्याही धर्म किंवा जातीचे असेले तरी त्यांना न्यायालयाच्या मदतीने लग्न करण्याचा अधिकार आहे.

2. हिंदू विवाह अधिनियम, 1955 - या कायद्याद्वारे जम्मु-कश्मीर सोडून सर्व जातीच्या स्त्री-पुरूषांना लग्न तसेच घटस्फोट देण्याचा अधिकार आहे.

3. हिंदू वारसा कायदा, 1956 - या कायद्याद्वारे स्त्री-पुरूषांना संपत्तीवर समान वारसा हक्क असेल.

4. हिंदू नाबालिक तसेच सुरक्षितता कायदा, 1956 -या कायद्याद्वारे वडीलाच्या मृत्यूनंतर आईला संरक्षक बनण्याचा अधिकार देण्यात आला आहे.

5. हिंदू दत्तक घेणे आणि पालन पोषण कायदा, 1955 -या कायद्याद्वारे दत्तक घेणे आणि स्त्रीयांना तसेच त्यांच्या आश्रीतांच्या पालन पोषणाची व्यवस्था केली आहे.

6. स्त्रिया आणि मुलींचा अनैतिक व्यापारावर विरोध कायदा, 1956 -वेश्यावृत्ती आणि अनैतिक व्यवहार थांबविण्यासाठी हा कायदा पारित करण्यात आला आहे.

7. हुंडा विरोधक कायदा, 1961 -हंुड्याची प्रथा बंद करण्यासाठी हा कायदा पारित करण्यात आला.

8. कारखाना अधिनियम 1948 -या कायदया अंतर्गत 14 वर्षापेक्षा कमी वय असलेल्या बालकांना कामावर ठेवता येत नाही.

9. बाल विवाह अवरोध अधिनियम 1929 तसेच संषोधित 1976 -हा कायदा अल्पवयीन मुलांच्या लग्नाला विरोध करतो.

**निष्कर्ष:**

आज अशी दु:खद परिस्थिती आहे की, भारतामध्ये कठोर कायदे असून सुध्दा मानवाधिकाराचे मोठ्या प्रमाणात हनन होत आहे. या मानवाधिकाराचे हनन केवळ गरिब आणि अशिक्षीत लोकच करत नाही, तर मोठया श्रीमंत व शिक्षीत लोकांमध्ये सुध्दा याचे प्रमाण खुप जास्त आहे. मानवाधिकाराचे रक्षण करणे लोकषाहीसाठी सर्वात मोठी समस्या आहे. मानवाधिकाराचे रक्षण म्हणजेच पिडीत स्त्री, लहान मुलं, अपंग तसेच वंचित घटक यांचे हिताचे संरक्षण करणे होय. या समस्येचा प्रतिकार चिंता व्यक्त करून, घोषणापत्र जाहीर करून किंवा राजकीय संदेषाद्वारे केले जाऊ शकत नाही. तसेच कोणत्या करारावर सही करून ही समस्या दूर करणे शक्य नाही. ही गोष्ट लक्षात ठेवायला पाहिजे की, फक्त शोषनच मानवाधिकाराचं हनन नाही, तर लोकांना त्यांच्या अधिकारापासून वंचित करणे हे सुध्दा मानवाधिकराचे हननच आहे. भारतामध्ये मानवाधिकराच्या हननाचे मुख्य कारण म्हणजे गरिबी आणि अषिक्षा हाच आहे. मानवाधिकाराचा सार्वजनिक स्तरावर स्विकार केल्यानंतर सुध्दा लोकांच्या उत्पीडनाच्या घटनांमध्ये रोजच वाढ होत आहे. खरं तर हे यासाठी होत आहे कारण मानवाधिकाराच्यारक्षणाचा संकल्प सरकारी फाईल आणि दस्तावेजांमध्येच बंद होऊन राहिलेला आहे. त्यामुळे बाल विवाहाची प्रथा कायम आहे, हुंडाबळी वाढत आहेत,देवदासी सारख्या प्रथेद्वारे आज सुध्दा महिलांना वेष्या व्यवसायामध्ये ढकलले जाते. गरीब ग्रामीण कुटुंबातील मुलींना अनैतिक अवैध व्यापासाठी खरेदी विक्री केली जाते. जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात लहान मुलं, महिला व विधवांसोबत भेदभाव केल्या जातो.

**संदर्भ:**

डॉ. विप्लव, मानवाधिकार के आईने में महिलाएँ, विस्ट इंटरनेशनल पब्लिशिंग हाऊस, दिल्ली- 110053, 2011- पृ.260

डॉ. विप्लव, मानवाधिकार के आईने में महिलाएँ, कित्ता, पृ. 265

डॉ. शर्मा कृष्णकुमार, मानवाधिकार एवं शिक्षा, अर्जुन पब्लिशिंग हाऊस, नई दिल्ली-110002, 2012, पृ. 86

खंडेला मानचंद, मानवाधिकार एवं सामाजिक न्याय, अविष्कार पब्लिशर्स, डिस्ट्रीव्यूटर्स, जयपूर 302003 (राजस्थान), 2008, पृ. 18

डॉ. शर्मा कृष्णकुमार, मानवाधिकार एवं विश्व, अर्जुन पब्लिशिंग हाऊस, नई दिल्ली-110002, 2012